2019 - 2020

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - II APRIL - JUNE - 2020

MARATHI PART - II / ENGLISH PART - I

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या स्वप्नातील ग्रामविकास संकल्पनेचे अध्ययन<br>अमोल जगन्नाथ शेन्डे<br>डॉ. आर. बी. शंभरकर | १-३ |
| २ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : एक प्रभावी व्यक्तिमत्व<br>प्रा. डॉ. अनिता विवेक महावादीवार | ४-९ |
| ३ | राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेतील ग्रामविकास आणि राष्ट्रविकास विषयक विचार<br>डॉ. अंजली मुकुंद पांडे-जोशी | १०-१५ |
| ४ | राष्ट्र विकासात महिलांचे योगदान<br>प्रा. कु. अर्चना मधुकरराव होरे | १६-२१ |
| ५ | राष्ट्रसंतांचा महिला संघटन विषयक दृष्टीकोन<br>प्रा. डॉ. अशोक एन. सालोटकर | २२- |
| ६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे व्यक्तीमत्त्व व कार्य<br>Dr. Chunnilal P. Sakharwade | २५-२६ |
| ७ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज<br>सहा. प्रा. गिरीश गं. गवई | २७-२८ |
| ८ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा शैक्षणिक दृष्टीकोन<br>प्रा. डॉ. कल्पना एम. कवाडे | २९-३२ |
| ९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज - व्यक्तिमत्व आणि कार्य<br>मनिषा आनंदराव चरडे | ३३-३८ |
| १० | राष्ट्रसंतांना अपेक्षित शिक्षण व बदलती शैक्षणिक परिस्थिती<br>प्रा. डॉ. ओमराज म. गजभिये | ३९-४२ |
| ११ | ग्रामविकासात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची भुमीका - एक अध्ययन<br>प्रा. डॉ. पंढरी ना. वाघ | ४३-४७ |
| १२ | महाराष्ट्राला प्रबोधनाची दिशा देणाऱ्या शिल्पकारापैकी एक 'संत तुकडोजी महाराज'<br>डॉ. पद्माकर प्रेमदास दारोंडे | ४८-५४ |
| १३ | भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात आणि ग्रामीण विकासात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे योगदान<br>डॉ. प्रणया महेंद्र पाटील | ५५-५८ |

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : एक प्रभावी व्यक्तिमत्व

प्रा. डॉ. अनिता विवेक महावादीवार
वाणिज्य विभाग, भिवापूर महाविद्यालय, भिवापूर.

**प्रास्ताविक**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे आधुनिक काळातील महान संत होते. भारत देशातील महाराष्ट्र राज्यातले एक आध्यात्मिक संत होते. पूर्वीपासूनच महाराष्ट्राला संताची परंपरा लाभलेली दिसून येते. महाराष्ट्राची भूमी मोठमोठे संत व महात्म्यांमुळे पावन झालेली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज तर महाराष्ट्राच्या संतपरंपरेचे खरं खुरं वाहक होते असे म्हणायला हरकत नाही. महाराष्ट्रातील विदर्भात असलेला अमरावती जिल्हा, चंद्रपूर जिल्हा, वर्धा जिल्हा तर राष्ट्रसंतांच्या महान कार्याची शिकवण मिळालेला जिल्हा आहे असे म्हणावयास हरकत नाही. एवढेच नव्हे तर त्यांचे कार्य याच जिल्ह्यात नव्हे तर संपूर्ण भारतभर व यापुढेही जाऊन विदेशातही त्यांच्या कार्याची ओळख झालेली दिसून येते. अशा एक महान व्यक्तिमत्व असलेल्या महापुरूषाच्या संपूर्ण जीवनकार्यावर एक दृष्टिक्षेप टाकणे मी माझे एक कर्तव्य समजते.

**राष्ट्रसंतांचे बालपण**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल, १९०९ मधे अमरावती जिल्ह्यातील शहीद यावली नावाच्या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव माणिकदेव बंडोजी इंगळे ठाकूर (ब्रम्हाभट) होय. त्यांचे लहानपणीचे नाव माणिक होते. आईचे नाव मंजुळादेवी तर वडिलांचे नाव श्री. बंडोजी अर्थात नामदेव गणेशपंत इंगळे ठाकूर (ब्रम्हाभट) होते. अकोटचे ब्रम्हानिष्ठ हरिबुवा आणि माधानचे अलौकिक संतश्री गुलाबराव महाराज यांनी स्वत: नामकरणविधी संपन्न केला. प्रतिकूल स्थितीचे अनेक चटके त्यांनी लहानपणी सहन केले. केवळ चौथी शिकलेल्या राष्ट्रसंतांनी सुमारे ५० ग्रंथांची निर्मिती केली. अप्रकाशित वाड्मयही बरेच आहे. ही उर्जा त्यांना कुठून मिळाली, या प्रश्नाचा विचार करताना त्यांच्या आयुष्याचे अनेक कंगोरे समोर येतात. वडिलांच्या हेकेखोर वृत्तीला कंटाळून ते आणि त्यांची आई मामांकडे श्रीक्षेत्र वरखेडला राहात होते. तिथे लहानपणीच त्यांना आडकोजी महाराजांचा सहवास लाभला. आडकोजींच्या निधनानंतर त्यांचे मन अस्वस्थ झाले. मनात वेगवेगळे विचार येऊ लागले. मन सैरभैर होताच त्यांनी पंढरीचा रस्ता धरला. तिथे जाताच त्यांनी पंढरीनाथाचे पाय बराच वेळ धरल्यामुळे बडव्यांचे फटके त्यांना खावे लागले. पंढरी ज्या पुंडलिकामुळे वसली तिचा विचार त्यांच्या मनात आला. आई–वडिलांची सेवा करण्याचे ठरवून ते तिथून परत आले. त्यानंतर त्यांनी काही दिवस शिवणकाम केले. पण तिथेही मन रमत नव्हते. शेवटी १५ जानेवारी, १९२५ ला गृहत्याग करून तपोसाधनेसाठी ते रामटेकच्या वनात निघून गेले. खडतर तपश्चर्येनंतर अवतारी योगिराजाकडून त्यांना कृपाप्रसाद मिळाला. सात महिने श्रीराम मंदीर, नारायण टेकडी, कपूरबावडी परिसरात योगसाधना केली. १

ऑक्टोबर, १९२५ ला चंद्रपूर जिल्ह्यातील नेरीला कृष्णराव भूते यांच्या आग्रहावरून गेले. चिमूरच्या बालाजी मंदीरात भजन गायिले. १९२६ च्या दरम्यान सहा महिने रामदेगी, सात बहिणी पहाड आणि ताडोबा येथील वनात वास्तव्य केले. साधना आणि सेवाधर्माचे आचरण करीत असताना त्यांनी भजने म्हणायला सुरूवात केली. १९२९ ला 'श्री तुकड्यादासकृत भजनावली' प्रकाशित झाली. सध्या 'स्वानंदामृत भजनावली' असे नाव आहे

**राजकीय पर्व**

देशात १९३० ते १९४० हा कालखंड राजकीय धामधुमीचा होता. लोकांना एकत्र आणून त्यांच्यात राष्ट्रभक्तीचे बीज पेरण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न केले जात होते. राष्ट्रसंतांनी या काळात अनेक मोठे यज्ञ केले. त्यांनी १९३५ मधे दहा लाख लोकांच्या उपस्थितीत सालबर्डीत तर १९३६ मधे ठाकुरांच्या बागेत यज्ञ करून लोकांना जागृत केले. राष्ट्रभक्तीचे बाळकडू त्यांनी वऱ्हाडला पाजले. त्यांच्या डफली आणि खंजिरी भजनांनी अन्यायी इंग्रजी राजवटीविरूध्द तरूणांचे रक्त सळसळायचे. जनजागृतीबरोबर राष्ट्रधर्म जागविण्याचे काम त्यांनी केले. याच काळात ३१ मार्च, १९३६ ला महात्मा गांधी यांनी राष्ट्रसंतांना सेवाग्रामला बोलविले. एक महिना राष्ट्रसंत गांधीजीजवळ राहिले. तिथून परत आल्यानंतर त्यांनी खादी वापरायला सुरूवात केली. ५ मे, १९३६ मधे पवनार आश्रमात विनोबा भावे यांनी महाराजांना संमेलनात सहभागी होण्यासाठी आमंत्रण दिले. १९३८ ला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रामटेक येथील कार्यक्रमात गोळवलकर गुरूजींची भेट घेतली. १९४० मधे आकोल्याच्या शीख धर्म परिषदेत सहभाग घेतला. गावागावात आरती मंडळ स्थापन करून लोकजागृती करण्याचे काम त्यांनी केले. आदिवासींना जीवन जगण्याचा पाठ दिला. १९४१ ला वरखेडला श्री गुरूदेव चरखा संघ स्थापन केला. २५ सप्टेंबर १९४२ मधे बेलापूर साखर कारखान्यातील भजनानंतर महाराजांना क्रांतीवीर तुकडोजी अशी ओळख निर्माण केल्या गेली. १९४२ ला मोझरी येथे राष्ट्रधर्म शिक्षण वर्गात मर्दानी व मैदानी व्यायामाचे शिक्षण दिले.

याच काळात महाराजांनी व्यक्तिगत सत्याग्रह केला. भारत छोडो आंदोलनात त्यांनी मोठ्या हिरीरीने सहभाग घेतला. १९४२ मधील आष्टी आणि चिमूर सत्याग्रहाचे नेतृत्व त्यांनी केले. इंग्रजांच्या ही गोष्ट ध्यानात आली. ब्रिटिशांनी त्यावेळी जी अमानवीय मुस्कटदाबी चालवली होती त्याचा त्यांनी जोरदार विरोध केला. 'अब काहे को धुम मचाते हो' या भजनावरून राष्ट्रसंतांना अटक केली. नागपूर तसेच रायपूरच्या कारागृहात त्यांना १०० दिवस (२८ ऑगस्ट ते २ डिसेंबर, १९४२) डांबून ठेवले.. वर्धा आणि चिमूर जिल्ह्यात भाषण करू नये, अशी बंदी त्यांच्यावर सरकारने घातली.

**गुरूकुंज आश्रमाची स्थापना**

कारागृहातून सुटल्यावर तुकडोजींनी सामाजिक सुधार आंदोलन सुरू ठेवून अंधविश्वास, अस्पृश्यता, मिथ्या धर्म, गोवध तसेच अनेक सामाजिक वाईट, प्रथांविरूध्द संघर्ष केले. त्यांनी नागपूरपासून १२० किमी दूर मोझरी येथे गुरूकुंज आश्रमाची स्थापना केली. त्यांच्या सक्रिय अनुयायांकडून अनेक रचनात्मक कार्यक्रम चालविले जातात. आश्रमाच्या प्रवेशद्वारावरच आपल्याला याची प्रचिती येते. ''हे मंदीर सर्वांसाठी खुले आहे.''

''प्रत्येक धर्म व पंथाच्या लोकांचे इथे स्वागत आहे.'', ''देश आणि विदेशातील प्रत्येक व्यक्तीचे इथे स्वागत आहे.'' या विधानांवरून त्यांच्यातील ''वसुधैव कुटुंबकम्'' याविषयीची कल्पना दिसून येते. १९४३ मधे त्यांनी गुरूदेव मासिक सुरू केले. १९४४ मधे अनेक गावांमधे महिला मंडळ आणि राष्ट्रसेविका समितीची स्थापना केली.

### स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळातील कार्य

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर तुकडोजी महाराजांनी ग्रामीण भागाच्या पुर्ननिर्माणावर लक्ष केंद्रित केले. त्यांनी अखिल भारतीय श्री गुरूदेव मंडळाची स्थापना केली व एकीकृत ग्रामीण विकासाकरिता अनेक कार्यक्रम विकसित केले. ११ नोव्हेंबर, १९४७ ला रामटेकचे मंदीर हरिजनांसाठी खुले केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तुकडोजींनी आपले लक्ष ग्रामीण पुर्ननिर्माण कार्याकडे वळविले. रचनात्मक कामे करणाऱ्यांसाठी त्यांनी वेगवेगळ्या प्रकारची शिबिरे आयोजित केली. त्यांचे कार्य राष्ट्रहिताला जोडून होते. महाराजांची क्रियाशिलता आणि वैचारिकता एवढी प्रभावशाली होती की की, त्यावेळचे भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी गुरूकुंज आश्रमात झालेल्या मोठ्या समारोहात त्यांनी महाराजांना **'राष्ट्रसंत'** या उपाधीने सन्मानित केले. तेव्हापासूनच लोक त्यांना 'राष्ट्रसंत' म्हणू लागले. भूदान चळवळीत विनोबा भावे यांच्याबरोबर त्यांनी काही दिवस दौरा केला. अकरा दिवसात ११४१० एकर जमीन मिळाली. भारतातील ग्रामीण जनता अतिशय गरीब आहे. जास्तीत जास्त लोकांकडे अतिशय कमी जमीन व फारच थोड्या लोकांकडे जास्त जमीन अशी विषमता त्याना पहावयास मिळाली. ग्रामीण जनतेला आपल्याजवळील भूमिच्या तुकड्यावर शेती करता यावी यासाठी १९४९ ला आमगावात सामुदायिक शेतीचा यशस्वी प्रयोग त्यांनी राबविला. जेणेकरून ग्रामीण जनतेलाही चांगले जीवन जगता येईल. पुढे १९५३ ला १५ व्या विदर्भ साहित्य संघाचे उद्‌घाटक व आयोजकपदाचा मान त्यांना मिळाला.

### ग्रामगीतेची रचना आणि विदेशातील प्रवास

२२ जुलै, १९५३ ला पंढरपूर येथील चंद्रभागेच्या तीरी ग्रामगीता लेखनाची प्रेरणा राष्ट्रसंतांना मिळाली. आपल्या अनुभव आणि अंतदृष्टिच्या आधारावर राष्ट्रसंतांनी ग्रामगीताची रचना केली. ज्यात वर्तमानातील स्थिती लक्षात घेऊन ग्रामीण भारताच्या विकासाची नवीन कल्पना त्यांनी मांडली. १९५५ मधे जपानमधे भरलेल्या जागतिक धर्मपरिषदेत त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी डफली आणि खंजिरीच्या स्वरांची आपल्या भाषणाला जोड दिली. आणि अवघी धर्म परिषद दुमदुमून गेली. त्यावेळी १८ देशाच्या समितीचे सल्लागार म्हणून त्यांची नियुक्ती झाली. स्वामी विवेकानंदांच्या नंतर त्यांनाच हा मान मिळाला. त्याच वर्षी विदर्भ साहित्य संघाच्या तुमसर संमेलनात त्यांचा थोर साहित्यिक म्हणूनही गौरव करण्यात आला. याच संमेलनात आणि विदर्भात शंभर गावात एकाच वेळी त्यांच्या ग्रामगीतेचे प्रकाशन करण्यात आले. ग्रामगीता हा त्यांनी मराठी संस्कृतीला दिलेला अमोल ठेवा आहे. ग्रामगीतेत केवळ आध्यात्मिकच नव्हे तर भौतिकदृष्ट्या सुखी होण्याचा मार्ग दाखविते. ग्रामगीतेतील त्यांची ग्रामोन्नतीबाबतची संकल्पना आजही उपयुक्त अशी आहे. ग्रामोन्नती सोबतच समाजातील ज्वलंत प्रश्नांवर सुध्दा त्यांनी आपल्या ग्रामगीतेत प्रकाश टाकलेला दिसून येतो.

**राष्ट्रसंतांचे ग्रामोन्नतीविषयीचे विचार**

भारत हा खेड्यांचा देश आहे हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्रविकास होईल, अशी तुकडोजी महाराजांची श्रध्दा व विचारसरणी होती. समाजातील सर्व घटकातील लोकांचा उध्दार कसा होईल याविषयी त्यांना सतत चिंता सतावत होती. ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच होता. भारतातील खेड्यांच्या स्थितीची त्यांना पुरेपूर कल्पना होती. त्यामुळे त्यांनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मूलभूत स्वरूपी विचार केला व त्या समस्या कशा सोडवाव्यात याविषयी उपाययोजनाही सुचविली. सुचविलेली उपाययोजना अतिशय परिणामकारक ठरली. ग्राम हे सुशिक्षित व्हावे, सुसंस्कृत व्हावे, ग्रामोद्योग संपन्न व्हावेत, गावानेच देशाच्या गरजा भागवाव्यात, ग्रामोद्योगांना प्रोत्साहन मिळावे, प्रचारकांच्या रूपाने गावाला नेतृत्व मिळावे, असा त्यांचा प्रयत्न होता.

**राष्ट्रसंतांचे अंधश्रध्देविषयीचे विचार**

याशिवाय देवभोळेपणा जुनाट कालबाह्य अंधश्रध्दा नाहीशा व्हाव्यात, याविषयी त्यांनी अविरत प्रयत्न केले. सर्वधर्म समभाव हेही राष्ट्रसंताच्या विचारविश्वाच एक वैशिष्ट्यच होते. त्यासाठी त्यांनी सर्वधर्मीय प्रार्थनेचा आग्रहपूर्वक पुरस्कार केला.

**राष्ट्रसंतांचे महिलोन्नतीविषयीचे विचार**

महिलोन्नती हाही तुकडोजी महाराजांच्या विचारविश्वाचा एक लक्षणीय पैलू होता. कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, राष्ट्रव्यवस्था ही स्त्रीवर कशी अवलंबून असते. हे त्यांनी आपल्या किर्तनांद्वारे समाजाला पटवून दिलं. त्यामुळे स्त्रिला अज्ञानात व दास्यात ठेवण कसं अन्यायकारक आहे, हे त्यांनी अत्यंत प्रभावीपणे पटवून दिलं.

**राष्ट्रसंतांचे तरूणांविषयीचे विचार**

देशातले तरूण हे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ आहेत. ते बलोपासक असावेत म्हणजे ते समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करू शकतील. ते नीतिमान व सुसंस्कृतयुक्त कसे होतील, याविषयीच उपदेशपर व मार्गदर्शनपर लेखन त्यांनी केल. व्यसनाधीनतेचा तीव्र निषेध राष्ट्रसंतांनी आपल्या लेखनातून केला.

१९५५ साली जपानचं निमंत्रण स्वीकारून त्यांनी तेथील विश्वधर्म आणि विश्वशांती परिषदांना स्तिमित केले. ते अठरा देशांच्या समितीचे सल्लागार म्हणून नियुक्त झाले. व्हिएतनाम सारख्या देशांची सुध्दा निमंत्रणे त्यांना बरीच येत राहिली. या यात्रेदरम्यान त्यांनी जपान यात्रेवर पुस्तक देखील लिहिले. तुकडोजी महाराज विश्व हिंदू परिषदेचे संस्थापक उपाध्यक्ष होते. त्यांनी राष्ट्रीय हितासाठी अनेक स्तरावर कार्य केले. जसे– बंगाल येथील दुष्काळ (१९४५), चीन युध्द (१९६२), कोयना भूकंपामुळे उडालेला हाहाकार (१९६२), पाकीस्तान हमला (१९६५) इ. देशावर येणाऱ्या संकटांमुळे तुकडोजी महाराज प्रभावित झाले आणि ते रचनात्मक मदत कार्याकरता या सगळ्या मोहिमांवर गेले होते. सर्वधर्मसमभाव हेही राष्ट्रसंताच्या विचारविश्वाच एक वैशिष्ट्यच होते. त्यासाठी त्यांनी सर्वधर्मीय प्रार्थनेचा आग्रहपूर्वक पुरस्कार केला

**भारतातील साधूसमाजाचे गठण**

१९५६ मधे राष्ट्रसंतांनी भारत साधु समाज निर्माण करण्याचे दुष्कर कार्य करून दाखविले. ज्यात विविध धर्म—पंथांच्या संस्थापकांचा सक्रीय सहभाग होता. स्वतंत्र भारतातील पहिल्या संतसंमेलनाचे पहिले अध्यक्ष तुकडोजी महाराज होते. तीन वर्षे ते सर्व महामंडलेश्वराचे अध्यक्ष राहिले. गुजरात आणि मुंबईत 'सर्वधर्म परिषद'गाजवणाऱ्या माराजांना विश्वधर्म परिषदेसाठी ५२ सालीच अमेरिकेचं निमंत्राण आलं होत. विश्व हिंदु परिषदेच्या नाशिक आणि प्रयागच्या अफाट संमेलनात सारे महामंडलेश्वर, शंकराचार्य आणि महंतावर आपला प्रभाव पाडला. महात्मा गांधी, मामना मालवीय, लालबहादुर शास्त्री, पं. नेहरू, राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद, डॉ. सर राधाकृष्णन, डॉ. सी. डी. देशमुख, शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. हेडगेवार, आचार्य कृपलानी, आचार्य डॉ. आर्यनायकम्, जयप्रकाश नारायण, भाई डांगे, स्वातंत्र्यवीर सावरकर, सं. वा. किर्लोस्कर, पं. सातवळेकर, पद्मश्री खांडेकर, आचार्य अत्रे, शाहू मोडक, योगीराज सितारामदासजी, महामंडलेश्वर जयेंद्रपुरीजी अशा विभिन्न क्षेत्रातील हजारों दिग्गजांनी मुक्तकंठान ज्यांचा गौरव अशा सहस्त्रपैलू व्यक्तिमत्वाच्या राष्ट्रसंतांनी मातीतून सेना निर्मून अल्पावधीत जे अमोल नि अमोघ कार्य सर्वांगीण दृष्टीने उभे केले त्याला तोड नाही.

**राष्ट्रसंतांची साहित्य संपदा**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा 'ग्रामगीता' हा ग्राम विकासावरील ग्रंथ प्रसिध्द आहे. याशिवाय हिंदीतून लिहिलेले 'लहरकी बरखा' हे पुस्तकही प्रसिध्द आहे. त्यांचे साहित्य समाजातील प्रत्येक घटकांना उपयुक्त असे आहे. त्यांनी हिंदी आणि मराठी अशा दोन्ही भाषेत ३००० भजन, २००० अभंग, ५००० ओवी सोबतच धार्मिक, सामाजिक, राष्ट्रीय आणि औपचारिक तसेच अनौपचारिक शिक्षणावर आधारित ६०० पेक्षा अधिक लेख आहेत. याशिवाय आरत्या, स्वागत गीत, सुविचार, श्रीगुरूदेव महिमामृत, पोवाडे, मंगलाष्टके, प्रार्थनाष्टके असे अनेक साहित्य प्रकाशित व अप्रकाशित स्वरूपात आहेत.

**महानिर्वाण**

१९६८ साली त्यांना असह्य वेदना चालू असतानाही महाराजांनी सतत 'राष्ट्रधर्म जनजागृती' दौरा केला. उज्जयिनीला कार्यकर्ता संमेलन आणि गुरूकुंजात १६ राज्यांच्या प्रतिनिधीचे शिबीर गाजवीत 'गांधी गीतांजली' पूर्ण केली. आषाढीला पंढरीच्या देवदरबारी शेवटचे भजन करून केले. रूग्णशय्येवरूनच राष्ट्रसाठी व्यापक लेख लिहिला आणि भक्तांसाठी आकाशवाणी वरून 'आर्त संदेश' देऊन गुरूकुंज गाठले. मुंबई आणि गुरूकुंजात वेगवेगळया क्षेत्रातील हजारो व्यक्तिची आणि लाखो दर्शनार्थी नरनारीची रांग लागली. कोटी कोटी कंठातून प्रार्थना निनादल्या. कॅन्सरच्या वेदना किती भयानक असतात 'हे सांगून नागपूर सारख्या विदर्भातील मध्यवर्ती ठिकाणी कॅन्सर हॉस्पीटल उभारण्यास कार्यकर्त्यांना प्रवृत्त केलं. अखेरची पत्रपरिषद आणि सर्वधर्मीय प्रार्थना घेऊन महाराजांनी अश्विन वद्य पंचमी, शुक्रवार, दि. ११/१०/१९६८ रोजी दुपारी ४.५८ ला देह ठेविला. संपूर्ण राष्ट्राला चेतना देणारे वादळी जीवन अखेर शांत झाले. तुकडोजी महाराज हे एक प्रकाशणारा तारा होते. एक गतिमान नेता होते. ते खूप कला आणि कौशल्याचे ज्ञाता होते. आध्यात्मिक क्षेत्रात ते योगी

पुरूष म्हणून ओळखले जात होते. सांस्कृतिक क्षेत्रात त्यांची प्रसिध्दी एक ओजस्वी वक्ता आणि संगीतज्ञ म्हणून ओळख होती. त्यांचे व्यक्तिमत्व अतुलनीय आणि अद्वितीय होते. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे खूप पैलू होते. त्यांनी दिलेली शिकवण भावी पिढीला निश्चतच उपयुक्त ठरते.

**संदर्भ सूची**


- सावरकर, सुदाम, 'जीवनयोगी: राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज, चरित्र: खंड २', १९८३, प्रकाशक– सुदाम सावरकर.
- कामडी, खुशालदास, 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (जीवन व कार्य), २०१६, प्रकाशक– गिरीश विनायक यावणकुळे.
- संपादक– भगत, प्राचार्य रा. तु, 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरव ग्रंथ',२००९, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.
- तुकडोजी महाराज क्रांतीकारी राष्ट्रसंत–दैनिक सकाळ– २०/१०/२०१६.
- majimarathi.com/sant-tudkoji-maharaj-information.
- maharashtratimes.com/editorial/article/all
  about-st-tukdoji- maharaj/articles/how/66412152.cms
- wikiwand.com/mr/tukdoji maharaj
- esakal.com/Maharashtra/information-about-rashtrasant-tukdoji-maharaj-13849